Impact Factor – 6.261 ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

**Multidisciplinary International E-research Journal**

PEER REFREED & INDEXED JOURNAL

November-2018 Special Issue – LXXIII

hief Editor -
r. Dhanraj T. Dhangar,
ssist. Prof. (Marathi)
IGVS Arts & Commerce College,
eola, Dist – Nashik [M.S.] INDIA

Executive Editors :
Prof. Tejesh Beldar, Nashikroad (English)
Dr. Gajanan Wankhede, Kinwat (Hindi)
Mrs. Bharati Sonawane-Nile, Bhusawal (Marathi)
Dr. Rajay Pawar, Goa (Konkani)

This Journal is indexed in :
- University Grants Commission (UGC)
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmoc Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- International Impact Factor Services (IIFS)

or Details Visit To : www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

| | | | |
|---|---|---|---|
| 58 | मारुती चितमपल्ली यांच्या 'चकवाचांदण' आत्मचरित्रातील वनवैविध्य | प्रा. सचिन पाटील | 301 |
| 59 | लोकसाहित्य आणि ग्रामीण साहित्य:एक अनुबंध | डॉ.अनिल गर्जे | 304 |
| 60 | भारतीय लोकशाहीची पायाभरणी आणि ब्रिटीशकालीन कायदे-एक अभ्यास | डॉ.संभाजी पाटील | 309 |
| 61 | पंचवार्षिक योजनेमध्ये गृहनिर्माण धोरण | प्रा. नरेश इंगळे | 314 |
| 62 | जनाबाईंचे अभंग:एक अभ्यास | डॉ.प्रवीण कारंजकर | 319 |
| 63 | केशवसुत संप्रदायाची कविता | डॉ.भूषण रंध | 323 |
| 64 | विनोबा – जमनालाल बजाज संबंध | डॉ.दीपक लोणकर | 328 |
| 65 | उत्तम कांबळे यांच्या साहित्याच्या प्रेरणा | प्रा.माधव सूर्यवंशी | 332 |
| 66 | बचत गट आणि महिला सक्षमीकरण | प्रा.श्री.चंद्रकांत मोरे | 336 |
| 67 | सरदार कदमबांडे घराण्याचा संक्षिप्त परिचय | डॉ.शिवाजी वाघमोडे | 339 |
| 68 | आंतरराष्ट्रीय राजकारणावरील अशासकीय संघटनांचा वाढता प्रभाव : राष्ट्रासाठीचे आव्हान | डॉ. दिलीपसिंह निकुंभ | 343 |
| 69 | राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या साहित्यातील सामाजिक,सांस्कृतिक व राष्ट्रीय विचार | प्रा.एस.आर.वीरलार | 351 |
| 70 | भारतीय संविधानाचे शिल्पकार : डॉ.बाबासाहेब आंबेडकर | प्रा.विनय वाघ व डॉ.सुरेंद्र मोरे | 355 |
| 71 | पुनर्विचार : काही प्रश्नांचा धांडोळा | प्रा. लालबा दुमटकर | 361 |
| 72 | नव्वदोत्तर विदर्भातील शेतकरी चळवळीच्या नेतृत्वाचे समीक्षात्मक अध्ययन | प्रा.राजू लिपटे | 364 |
| 73 | भंडारा जिल्ह्यातील तापमानातील बदलाचा पर्यावरणीय अभ्यास | प्रा.श्रावण कापगते | 367 |
| 74 | अण्णाभाऊ साठे यांच्या कादंबरीतील स्त्री नायिकांचा समाजशास्त्रीय अभ्यास | प्रा.शरद गायकवाड | 373 |
| 75 | प्रवरेचा भगीरथ पद्मश्री डॉ.विठ्ठलराव विखे पाटील | डॉ. चंद्रकांत रुद्राक्षे | 377 |
| 76 | तणाव : मनातील द्वंद्वाचा अविष्कार | डॉ. मनीषा मुलकलवार व डॉ. प्रमोद मुलकलवार | 382 |
| 77 | भारतीय लोकशाही : पंचायतराज | डॉ.एन.बी.आघाव | 386 |
| 78 | राजर्षी शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानात स्त्री संरक्षणासाठी केलेले कायदे | डॉ. डी.एम. चौधरी | 390 |
| 79 | भारतीय लोकशाही प्रणाली आणि प्रांतवाद | डॉ. अरुण शेळके | 394 |
| 80 | तापलेले दिवस : आत्मशोधातून आलेली कविता | प्रा. हेमंतकुमार बागडे | 400 |
| 81 | आदिवासींचे वीर | डॉ. अंजली मस्करेन्हस | 404 |
| 82 | ई-ग्रंथालय बी. एड् प्रशिक्षणार्थ्यांसाठी अद्यावत शिक्षण व प्रशिक्षण घेण्यासाठी प्रभावी उपाय | प्रा. डॉ.दादासाहेब पवार | 409 |
| 83 | रामनाथ चव्हाण यांची कादंबरी 'निळी पहाट' | प्रा. गौतम बनसोडे | 412 |
| 84 | अश्वघोषाच्या साहित्यातील बौद्ध तत्त्वज्ञान | श्रीमती बकुल कांबळे | 418 |
| 85 | जागतिकीकरणाच्या प्रभावातील १९९० नंतरची मराठी कादंबरी | प्रा. प्राची जोशी | 426 |
| 86 | अण्णाभाऊंच्या साहित्यातील सामाजिक विचार | डॉ. प्रल्हाद होंडे | 435 |
| 87 | भारतीय राज्यघटनेचा सरनामा : एक विश्लेषणात्मक अभ्यास | डॉ. संभाजी पाटील | 438 |
| 88 | नव्वदोत्तर कथालेखकांच्या कथांतील आशयसूत्रे | डॉ. सहदेव चव्हाण | 445 |
| 89 | औरंगाबाद जिल्ह्यातील जलप्रणाली | डॉ. तुकाराम गजर | 450 |
| 90 | राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या विस्ताराची व्यूह रचना | प्रा. प्रदीप जगताप | 453 |




Scanned with CamScanner

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)-0.676 (2013)
Special Issue 73 :
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
November-2018

# राजर्षी शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानात स्त्री संरक्षणासाठी केलेले कायदे

डॉ. डी. एम. चौधरी
(इतिहास विभाग)
दादा पाटील महाविद्यालय,कर्जत
ता.कर्जत, जि.अहमदनगर
मो. ९७६६६२४९९५
Email-chaudhridattatray@gmail.com

**प्रास्ताविक :—**

कोल्हापूर संस्थाना मध्ये स्त्री संरक्षणासाठी अनेक कायदे राजर्षी शाहू महाराजांनी केले. महात्मा ज्योतिराव फुले यांचे जीवीतकार्य पुढे चालू ठेवणारा हा भारतातील पहिला लोकराजा होता. "जीच्या हाती पाळण्याची दोरी,ती जगाते उध्दारी" या म्हणी प्रमाणे स्त्री शिकली पाहिजे, समाज प्रवाहात आली पाहिजे म्हणून महात्मा ज्योतिराव फुले यांनी आपले आयुष्य वेचले. त्याच प्रमाणे तत्कालीन समाजात भारतीय स्त्रीयांचे जीवन अनेक बंधनानी बंदीस्त होते. अनेक रूढी,परंपरा,चालीरिती भोळया कल्पना भारतीय समाजात आस्तिवात होत्या. बाल विवाह, विधवा विवाहाला प्रतिबंध,शिक्षण बंदी,पडादा पध्दती,देवदासी ,सतीची चाल इत्यादी रूढीपंरपरांनी स्त्रीजीवन असहाय व पुर्ण परावलंबी बनलेले होते.तीच्या वर होणाऱ्या अन्याय अत्याचाराला वाचा फोडण्याचे कार्य महात्मा फुले यांच्या पासून ते राजर्षी शाहू महाराज न्या.रानडे, आगरकर ,महर्षी कर्वे या सारख्या समाजसुधारकांनी स्त्रीउध्दाराचे कार्य केले. राजर्षी शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानात स्त्री संरक्षणासाठी पुढील कायदे केले.विधवा पुनर्विवाह कायदा, आंतरजातीय कायदा, क्रूरपणाच्या वर्तनास प्रतिबंध करणारा कायदा, घटस्फोटाचा व वारशाचा कायदा, देवदासी प्रथा प्रतिबंद कायदा, बाल विवाहाची वयोमर्यादा वाढविणारा कायदा इत्यादी तिच्या नैसर्गिक हक्कांचे संरक्षण करणारे अनेक कायदे करून तिची समाजाकडून आणि कुटूंबाकडून होणारी पिळवणूक थांबविण्याचा मोठा प्रयत्न केला. एक प्रकारे स्त्रीमुक्ती चळवळीस राजर्षी शाहू महाराजांचाच हातभार होतो असेच म्हणने योग्य ठरले

**विधवा —पुनर्विवाह कायदा :—**

सन १९१७ च्या जुलैमध्ये शाहू महाराजांनी आपल्या संस्थानात विधवांच्या पुनर्विवाहास कायदेशीर मान्यता देणारा कायदा संमत केला.हिंदूच्या अनेक जातींत विधवांच्या पुनर्विवाहाच्या बाबतीत 'इतर विवाहाप्रमाणे योग्य विधी न करण्याची पध्दती' असल्यामुळे अनेक अडचणी निर्माण होत होत्या.ते या कायदयाने दूर करण्यात आल्या. या कायदयाने विवाहाची कायदेशीर नोंद करण्याची पध्दत सुरू केली. त्या मुळे विवाहाविधीचा कायदेशीर पुरावा अस्तित्वात राहू शकल्याने स्त्रीवर्गावर होणारा अन्यायाचा प्रतिकार करण्याचे साधन त्यांना उपलब्ध करून दिले. समाजाच्या स्वास्थ्यासाठी विधवाविवाहास कायदेशीर मान्यता असने ही अत्यंत आवश्यक बाब आहे असे राजर्षी शाहू महाराजांचे मत होते. सन १९१९ मध्ये कानपूर मधील कुर्मी क्षत्रिय परिषदेत या विषयावर बोलताना महाराज म्हणाले होते."कुर्मी क्षत्रियांमध्ये विधवाविवाह प्रचलित असलेला पाहून मला मोठा आनंद होतो " आपली क्षत्रिय जात भृणहत्या,व्यभिचारादी पापांपासून सुरक्षित राहिल असा माझा विश्वास आहे. याच परिषदेत स्त्रीवर्गास बंधनात घालून त्यांच्या स्वाभाविक गुणांचा उत्कर्ष रोखणाऱ्या पडादा पध्दतीचा राजर्षी शाहू महाराजांनी जाहिर निषेध केला होता. त्या संदर्भात ते म्हणाले होते " भारतवासीय लोक उन्नतीची तीन मुख्य साधने समजतात ती ही : पहिले साधन पडदा ,दुसरे विधवा विवाह —निषेध व तिसरे कोणाशीही मिळून



Scanned with CamScanner

भोजन न करणे. काय आश्चर्य आहे ! राजमता जिजाबाईसाहेब,कोल्हापूर राज्य संस्थापक महाराणी ताराबाईसाहेब,महाराणी सती अहिल्याबाई, महाराणी कमलाबाई आदी क्षत्रिय स्त्रियांनी राज्याचा गाडाही हाकलेला आहे व रणांगणावर जाऊन लढायाही मारलेल्या आहे. हे सर्व काम पडदयात राहून केवळ अशयक होते " [१] अशा पध्दतीचे उद्‌गार कानपूरच्या कुर्मी क्षत्रिय परिषदेत काढलेले होते.

**आंतरजातीय विवाह कायदा :–**

आंतरजातीय विवाह कायदा कोल्हापूर संस्थानात १२जुलै १९१९मध्ये लागू केला.'कोल्हापूर इलाख्यातील विवाहासंबंधी कायदा ' या नावाने गॅझेटमध्ये प्रसिध्द झाला. या कायदयाने कोल्हापूर संस्थानातील हिंदू व जैन या दोन मुख्य धर्माच्या लोंकाना " जातिनिर्बंध न पाळता सदरहू दोहोपैकी आपआपल्या कोणत्याही धर्माच्या मनुष्याशी विवाह करण्याची मुभा "दिली गेली. त्यांचे अशा प्रकारे होणारे आपआपसातील विवाह कायदेशीर ठरविले गेले. या कायदयाने एका कलामान्वये विवाहकाली पुरूषाचे वय १८ वर्षे पुर्ण व स्त्रीचे वय १४ वर्षे पुर्ण असले पाहिजे असा निर्बंध घातला गेला. त्या काळात बालविवाह पध्दत सर्वत्र रूढ होती. मुलींचे विवाह सर्वसाधरणपणे १० वर्षाच्या आतच केले जात होते. इंग्रज सरकारने सन १८९१ साली मोठया धाडसाने'संमती वयाचा कायदा 'मंजूर करून विवाहोत्तर ' मुलींचे संभोग वय किमान दहा ऐवजी बारा ' वर्षे असावे असा दंडक घातला होता.तथापी या बारा वर्षे वाढीव वयाचा दंडक हिंदू धर्माचारत ढवळाढवळ करणारा आहे,अशी भूमिका लोकमान्य टिळकांदी परंपरानिष्ठांनी घेवून त्यास मोठा विरोध केला होता. या पार्श्वभूमीवर विवाहप्रसंगी मुलीचे वय किमान चौदा असावे असे सांगणारा कायदा पुरेगामीच म्हटला पाहिजे. या कायदयातील पुढे कलम असे दर्शविते की,१८ वर्षे पुर्ण झालेल्या स्त्रीला विवाहासाठी पित्याची अथवा पालकांची आवश्यकता असणार नाही!स्त्रीला आपला जन्माचा जोडीदार निवडण्याचे पुर्ण स्वातंत्र्य देणारे हे मोठे वैशिष्टयपुर्ण कलम होते.तसेच या कायदयाखाली होणाऱ्या विवाहाची रीतसर नोंदणीही होणार होती. अशा प्रकारे हा कायदा म्हणजे स्त्री–पुरूषांच्या सामाजिक स्वातंत्र्याचा पुरस्कार करणाराच होता.[२]

**क्रूरपणाच्या वर्तनास प्रतिबंध करणारा कायदा :–**

२ऑगस्ट १९१९ रोजी कोल्हापूर सरकारच्या गॅझेटमध्ये 'स्त्रियांना क्रूरपणे वागविणे नाहिसे करावे किंवा त्यास प्रतिबंध करावा म्हणून केलेले कायदा' आणि 'कोल्हापूरचे काडी मोडण्याचे(घटस्फोट) नियम ' हे दोन कायदे स्त्रियांना संरक्षण देणारे केले. अनेक कुटूंबात नवरा व त्यांचे नातलग यांच्याकडून स्त्रियांचा अनेक प्रकारे छळ होत असे. छळाचा कोणताही प्रकार न्यायदेवतेच्या नजरेतून सहजा सहजी सुटणार नाही,अशा प्रकारचा सर्वसमावेशक कायदा महाराजांनी तयार केला. हा कायदा जारी होण्यापुर्वी महाराजांनी त्यांची उदिष्टये व कारणे स्पष्ट करणारा आपल्या सहीचा एक आदेश जाहिर केला होता. या आदेशावरून महाराजांनी कुटूंबामध्ये होणाऱ्या स्त्रियांच्या छळाचा किती बारकाईने विचार केला होता हे दिसून येते. महाराज आपल्या आदेशामध्ये म्हणतात 'हिंदूस्थानात पाश्चात्य शिक्षणाचा इतका मंदगतीने प्रसार होत आहे की त्याचा उपयोग स्त्रियांची स्थिती सुधारण्याच्या कामी व्हावा तितका होत नाही;पण या परवानगीचा दुरपयोग करून स्त्रियांना वाटेल तशा पध्दतीने वागविण्याचा आपणास परवानाच मिळाला आहे,अशी पुरूषाची समजूत झालेली आहे आणि म्हणून पूरूषवर्गाकडून स्त्रियांवर होणारा अत्याचारास आळा घालावा म्हणून हा कायदा केलेला आहे.[३]



Scanned with CamScanner

2348-7143
November-2018

**घटस्फोटाचा व वारशाचा कायदा :–** असे त्यांना वाटत होते.

घटस्फोट संबंधीचा जो कायदा केला त्यामुळे स्त्रीयांच्या हक्काचे रंक्षण होईल या कडे लक्ष ठेवून शाहू घटस्फोटा नंतर तिच्या अन्नवस्त्रखर्चाची योग्यती व्यवस्था कशी केली जाईल तर त्याच्या ताब्या बद्दलची महाराजांनी तशी कलमे कायदयात तयार केली होती. तसेच वैवाहिक संतती असेल जात पंचायतीच्या वर ,पोटगी बद्दलची व शिक्षणा बद्दलची व्यवस्थाही या कायदयाने केली होती. या कायदयाने तिच्या नैसर्गिक हक्कांना अधारलेला व प्रसंगी स्त्रीयावर अन्याय करणारा घटस्फोट अमान्य करण्यात आला.तसेच १९२० रोजी " हिंदू कायदयाचा दृढ पाया देण्यात आला.[४] तसेच करवीर सरकारच्या गॅझेट मध्ये १७ जानेवारी कायदा प्रसिद्ध वारशाच्या कायदयाच्या दुरस्तीचा कायदा " या नावाचा एक महत्वपूर्ण सामाजिक सुधारणेचा वर्णाची करण्यात आला. या कायदयानुसार शुद्राची अनौरस संतती व ब्राम्हण,क्षत्रिय व वैश्य या तीन वरिष्ठ अनौरस अनौरस संतती यांना मिळणाऱ्या वारसाहक्कातील फरक काढून टकण्यात आला व सर्व वर्णाच्या स्त्रियांच्या संततीना जनक बापाच्या मिळकतीत वारसा हक्क दिला गेला . या कायदयाचे दुसरे कलम पतित उध्दाराच्या दृढीने महत्वाचा आहे.[५]

**देवदासी प्रथा प्रतिबंदक कायदा :–**

तत्कालीन समाजात ,कनिष्ठ वर्गात देवाच्या नावावर मुली सोडण्याची अनिष्ठ प्रथा मोठया प्रमाणावर अस्तित्वात अस्तित्वात होती.या प्रथेतून समाजात जोगतिण,मुरळी,देवदासी इत्यादी प्रकारच्या पतित स्त्रियांचा वर्ग आलेला होता. या वर्गाचे अस्तित्व म्हणजे समाजावरील कलंकच होता. हा कलंक निर्माण करणाऱ्या प्रथेस या कायदयाने प्रतिबंध करण्याच्या प्रयत्न शाहू महाराजांनी केला. जेव्हा या मुली देवाच्या नावाने सोडल्या जात तेव्हा त्या सर्वार्थाने देवाच्या बनत असत. जनक घरण्याशी त्यांचा काही संबंध राहत नसे. तसेच जनक आईबापाच्या मिळकतीत त्यांचा काही वारसा हक्क राहत नसे. पण त्याच बरोबर देवाला सोडल्यामुळे संबंधित देवस्थानातून तिला काहि परंपरेने चालत आलेला विशिष्ट हक्क मिळत असत आणि एक प्रकारचा विशिष्ट असा कायदयाच्या दृष्टीने सामाजिक दर्जाही प्राप्त होत असे.आत हे सर्व हक्क व दर्जा कितीही हिन प्रकारचा असला तरी त्याला समाजाची व परंपरेची मान्यता होती.महाराजांनी उपरोक्त कायदयाने हे हक्क व दर्जा अमान्य केला पण त्याच बरोबर या स्त्रियांना आपल्या जनक आईबापाच्या मिळकतीत वारशाचे हक्क प्राप्त करून दिला. तसेच देवाला सोडल्यामुळे या स्त्रियांना मिळणारा समाजातील कायदेशीर दर्जा अमान्य करण्यात येवून देवदासी प्रथेचा पायाच उखडून टकण्याचा महाराजांनी प्रयत्न केला.[६]

**मुल्यमापन :–** स्त्रियांच्या

राजर्षी शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानात स्त्री संरक्षणासाठी अनेक कायदे केलेले दिसून येते. सामाजिक स्वातंत्र्याच्या हक्काचे संरक्षण करणारे कायदे करून आपल्या पुरोगामी व लोककंल्याणी राजकारभाराची एक प्रकारे ग्वाहीच दिलेली दिसून येते. असे कायदे केल्याने स्त्रीयांच्यावरील अत्याचार थांबेल किंवा त्याची पिळवणूक थांबेल असे म्हणता येणार नाही कारण आजही अशा प्रकारचे कायदे अस्तित्वात असूनही स्त्रिंयावरील अत्याचाराचे प्रकार थांबलेले नाहीत. असे असले तरी शाहू महाराजांनी केलेल्या कायदयाचे सामाजिक महत्व कमी लेखता येणार नाही.ज्या काळात प्रगत इंग्रज सरकारच्या राज्यातही स्त्रियांच्या हक्काचे रंक्षण करणारे कायदे अस्तित्वात नव्हते आणि इंग्रज सरकार अशा प्रकारचे कायदे करून परंपरावाद्याचा रोष ओढावून घ्यावयास राजी नव्हते. त्या काळात शाहू महाराजांनी हे क्रांतिकारी कायदे करून त्याची अंमल बजावणी केलेली दिसून येते. कुटूंबामध्ये होणाऱ्या नाना प्रकारच्या क्रूर छळातून असहय स्त्रीची सुटका करावी

रूढी प्रथे पासून तिची मुक्तता करावी, हा विचार ... सुरु झाल्या पण या पार्श्वभूमीवर पाऊनशे वर्षापूर्वी या ... व त्यानुसार कृती करावी,ही घटना मोठी लक्षणिय मानावी ...

संदर्भ ग्रंथसूची:-


१. पवार जयसिंगराव,राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ,महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी ...
२. साळुंखे,नानासाहेब,शाहूंच्या आठवणी,वृषाली प्रकाशन,कोल्हापूर, ...
३. पवार जयसिंगराव,राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ,महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी ...
४. बागल,माधवराव, राजर्षी छत्रपती शाहू महाराज,यशदा प्रकाशन,मुंबई ...
५. पवार जयसिंगराव,राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ,महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी ...
६. जोशी,तर्कतीर्थ श्री लक्ष्मणशास्त्री,मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, ...




Scanned with CamScanner